काही दिवसापूर्वी देशाच्या सांस्कृतिक समतोलाला ठेच पोहोचवू शकतील अशा दोन घटना घडल्या. हा ढोंगी राष्ट्रवाद्याकडून जाणूनबुजून केलेला प्रयत्न होता. पहिल्या घटनेमध्ये, केरळ राज्यात मोठ्या उत्सवात ओणम हा सण साजरा केल्या जातो. हा सण राजा बळीच्या आगमना प्रीत्यर्थ त्याच्या स्वागतासाठी आयोजित केला जातो. याच उत्सवाच्या संदर्भात राष्ट्रीय स्वंयसेवक संघाची मल्यालम पत्रिका केसरी ने ओणम वर एक विशेषांक काढला. या विशेषांकामध्ये राजा बळी संदर्भातील काही बाबी अतिरंजित व केरळीच नव्हे तर सर्व बहुजन समाजांच्या भावनेला ठेच पोहोचविणाऱ्या होत्या. लेखामध्ये बळी राजाला असुर तथा राक्षसांचा राजा असे म्हटले. लेखक यावरच थांबला नाही तर ओणम हा उत्सव राजा बळीच्या स्वागतासाठी नसून वामनाच्या स्वागतासाठी आयोजित केला जातो असे बेमालूमपणे म्हटल्या गेले. याच संदर्भातील दुसऱ्या घटनेमध्ये, भाजपाचे अध्यक्ष अमित शहा यांनी सोशल मिडीया मध्ये एक ट्विट केले. ट्विटच्या खाली एक पोस्टर दाखविले आहे. या पोस्टरवरील चित्रामध्ये वामन (ब्राम्हण) राजा बळीच्या मस्तकावर पाय ठेवताना दिसत असून त्याला पाताळात ढकलून देतो. ह्या दोन्ही घटना एकाच वेळेस घडलेल्या आहेत. हा राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कूटनीतिक चारित्र्याच्या संगमनितीचा भाग आहे.

केसरीचे लेखक उन्नीकृष्णन नम्बुथिरीच्या म्हणण्यानुसार वामन हा विष्णूचा अवतार आहे. विष्णूने वामनाचा अवतार घेवून केरळ राज्याला साम्राज्यवादी बळी पासून मुक्त केले. बळी हा अतिमहत्वाची व्यक्ती नसून महाकाव्यामध्ये याबाबत फार कमी लिहिले गेले आहे. खरेतर उन्नीकृष्णन नम्बुथिरी आणि संघाचे मुखपत्र हे बहुजन समाजाची दिशाभूल करीत आहे. वास्तविक पुराणे, ब्राम्हणे व उपनिषदात बळी संदर्भात विस्तृत चर्चा केली गेली आहे. भारताची जनता राजा बळीला हजारो वर्षापासुन जाणते आणि मानते. हजारो वर्षापासून बहुजन स्त्रिया ह्या “ईडा पीड़ा टळो आणि बळीचे राज्य येवो” अशा म्हणत आल्या आहेत. असा बळी साम्राज्यवादी कसा असू शकतो? खरे तर वामन व बहुजन समाजाची नाळ कुठेच जुळत नाही. बटुक वामना सोबत ज्यांची नाळ जुळते ते लोक दसऱ्याला बळीचा कणकीचा पुतळा बनवितात व त्याचे पोट फाडून खाली ढकलून देतात.

ब्राम्हणांनी स्वत:ला “ईश्वर” म्हटलेले असून ब्राम्हणेत्तर समाजाला असुर संबोधले आहे. या तथाकथित ईश्वर (ब्राम्हण) व असुर (ब्राम्हणेत्तर) यांच्यात नेहमी वर्चस्वासाठी लढाई होत असायची. कधी कधी लढाई पूर्वी व नंतरही तह व्हायचे. परंतु ब्राम्हण असे तह सहजच तोडत असत. याउलट असुर विश्वास ठेवून तहाचे पालन करायचे. याचा परिणाम असा झाला की, ब्राम्हण पडद्या मागून बहुजनावर वार करून पराभूत करायचे. ब्राम्हनामध्ये नैतिकतेचा थोडाही अंश शिल्लक नव्हता. परंतु बहुजनांच्या नैतिकतेचे पालन करण्यामुळे त्यांना पराभूत व्हावे लागले. नमुची, वृत्र, हिरण्यकश्यप, प्रल्हाद, विरोचन, बळी, महिसासुर, खंडोबा यांच्यासोबत ब्राम्हणांनी दगाबाजी केली. त्यामुळेच महात्मा ज्योतिबा फुलेनी वैदिक संस्कृतीला “दगाबाज संस्कृती” असे म्हटले होते. अवतार कल्पना ही ब्राम्हणांच्या सुपीक डोक्यातून अवतरलेली स्वार्थी लालसा असून बहुजन समाजाला पिढ्यानपिढ्या गुलाम करून ठेवण्याचे कटकारस्थान होय.

उदाहरणाच्या स्वरुपात बघितल्यास वृत्र आणि इंद्र यांच्यातील युध्दाच्या स्वरुपात बघावे लागते. वृत्र आणि इंद्र यांच्यात झालेल्या तहानुसार आपसात लढूनही एकमेकाला मारायचे नाही असे ठरले होते. परंतु तह मोडून इंद्र वृत्राला मारण्यासाठी धावला. अचानक झालेल्या हल्ल्याने वृत्र घाबरला. इंद्राला तह

मोडल्याचे दुषणे दिले. गोंधळून वृत्राने आपली सर्व शक्ती इंद्राला अर्पण करण्याची इच्छा प्रदर्शित केली. परंतु वृत्राला मारायचेच हे आधीच ठरविले असल्यामुळे त्याने वृत्राला ठार मारले. शत्रूला कपटनिती ने मारणे, विरोधकांची बदनामी करने तसेच फोडा व झोडा ही ब्राम्हण्यवृत्ती हजारो वर्षापासून चालत आलेली आहे. हिरण्यकश्यप, प्रल्हाद, विरोचन, महाबली, महिसासुर आणि खंडोबा या बहुजन राजासोबत अशाच कटातून  आघात करण्यात आला.

राजा बळी ने यज्ञाला विरोध केला होता. म्हणून सारे ब्राम्हण बळी राजाच्या विरोधात उभे झाले. श्रीमत भागवत पुराणामध्ये आलेल्या कथेमध्ये बळीनी ब्राम्हणांना तर्काच्या माध्यमातून निरुत्तर केले होते. बळी   यज्ञयाग आणि कर्मकांड मानायला तैयार नव्हते. तरीही बळी ने वामनाला यज्ञ करण्यासाठी जागा दिली. मात्र राजा बळी विशेष वर्गाला विशेष सवलती देण्याच्या सक्त विरोधी होता. ब्राम्हणांच्या दृष्टीकोनातून हा एक धर्मद्रोह होता. याच कारणामुळे लोभी व कपटी ब्राम्हण नेता वामनाने ब्राम्हणेत्तर राजा बळीचा खुण केला. भागवत पुराणानुसारच वामनाच्या उपनयनाच्या वेळेस सूर्य खाली आला व त्याने सावित्री मंत्र म्हटले. आता एक मोठा प्रश्न निर्माण होतो. तो प्रश्न म्हणजे सूर्य आपली जागा सोडून खाली कसा आला? त्याने मंत्र कसे म्हटले? वामनासाठी सूर्य जमिनीवर अवतरला असेल तर मग सूर्याच्या आगीच्या तप्त गोळ्याने लोक कसे वाचले? त्यावेळी इतर ग्रहाची परिस्थिती कशी झाली? अशा अनेक प्रश्नाची उत्तरे कोणत्याही वैदिक साहित्यात सापडत नाहीत.

शतपत ब्राम्हनात स्पष्ट म्हटले आहे, क्षत्रिय हा केवळ सामान्य जनतेच राजा होवू शकतो परंतु ब्राम्हणांचा तो राजा बनू शकत नाही. तंतोतंत हाच नियम ब्राम्हणांनी शिवरायाच्या संदर्भात अंमलात आणला. शिवरायांच्या राज्यभिषेकास नकार देणे आणि पाश्च्यात्य लेखक जेम्स लेनच्या माध्यमातून बदनामी करून अलीकडच्या काळापर्यंत आपल्या पिढ्यांचा वारसा कायम जपला. शिवाजी महाराज दुसर्यासाठी राजे होते परंतु ब्राम्हणासाठी ते राजे नव्हते. म्हणून त्यांनी शिवाजी महाराजा सोबत दुर्व्यवहार केला.

“वामनावतार” च्या कथेनुसार वामनाने बळीकडे तीन पाय ठेवण्यासाठी जमिनीची मागणी केली होती. बळी ने आपल्या स्वभावानुसार जागा दिली. तेव्हा वामनाने आपल्या एका पायांनी जमीन तर दुसऱ्या पायांनी आकाश व्यापून टाकले. तिसरा पाय ठेवण्यासाठी जागा नसल्यामुळे वामनाने परत जागेची मागणी केली. तेव्हा बळीने आपल्या दातृत्व गुणामुळे वामनाचा तिसरा पाय ठेवण्यासाठी आपले डोके पुढे केले. तेव्हा बळीच्या डोक्यावर पाय ठेवून त्याला पाताळात ढकलून दिले. वामन पुराणातील ही कथा कोणत्या तर्कावर टिकू शकते? वैज्ञानिकदृष्ट्या ती पूर्णत: असत्य, काल्पनिक आणि असमर्थनीय आहे. ही कथा वस्तुत: षडयंत्र करून बळीचा खुण केल्यानंतर जनतेच्या रोषापासून  स्वत:ला वाचविण्यासाठी केलेला बनाव होता. जसे की, संत तुकाराम महाराजाची सदेह वैकुंठाला पाठविण्याची गोष्ट. ब्राम्हणांनी तुकाराम महाराजाचा खुण केल्यानंतर ते पुष्पक विमानातून सदैव वैकुंठाला गेल्याची थाप मारण्यात आली. इंद्रायणी नदीमध्ये डूबवून नष्ट करण्यात आलेल्या गाथा संत जगनाडे महाराजांनी लिहून काढल्या तेव्हा ब्राम्हणांनी तुकारामाच्या गाथा नदीच्या बाहेर आल्या अशा अफवा लोकामध्ये पसरविल्या. बहुजन समाजाला कशाही प्रकारे मुर्ख बनविता येते याचे हे उत्तम उदाहरण होय.

पुराण काळातील कथा ह्या कल्पना सौंदर्याचे उत्तम उदाहरण होवू शकतात. परंतु साऱ्या कथा ह्या अवैज्ञानिक होत्या. बहुजन समाजावर आपले धार्मिक वर्चस्व स्थापित करण्यासाठी ह्या कथा लिहिण्यात आल्या. जसे की, हजारो वर्षापूर्वीची ही घटना आहे. एके ठिकाणी ब्राम्हण ऋषी राहायचा .... त्याचा कुणीतरी अपमान केला  किंवा दान दिले नाही.... या कारणामुळे त्याला नरकात जावे लागले. ... त्याला पुढच्या जन्मी कुत्रा वा कावळ्याच्या रूपात जन्म मिळाला. अशा अनेक तथ्यहीन काल्पनिक कथांनी देशाच्या बहुजन समाजात भीती व दहशतयुक्त वातावरण निर्माण केले. सत्यनारायणाच्या कथा असोत वा अष्टविनायक गणपतीच्या मंदिरासमोर लिहून ठेवलेल्या कथा असोत. त्या सर्व बहुजन समाजाला मुर्ख बनविण्यासाठीचा बनाव आहे हे बहुजन समाजाने समजून घेतले पाहिजेत.

राष्ट्रीय स्वंयसेवक संघ हा बळी, महिसासुर आणि खंडोबा यांचे उत्सव कधीही साजरे करीत नाही परंतु अभिमानाने वामन, परशुराम आणि विष्णुची जयंती आणि होळी, दसरा आणि गुडीपाडव्या सारखे सण साजरे करतो. कारण ते त्यांचे टोळी नायक व बहुजनांच्या पूर्वजांच्या पराभूत होण्याचे क्षण होते. संघ अवतार कल्पनाचे भूत समोर करून बहुजन समाजाची विचारशक्ती नष्ट करून नव गुलामांची निर्मिती करीत आहे. संघाचे मुखपत्र केसरी मध्ये वामनाच्या कथेला ठळक स्वरूप देणे, अमित शहा यांचे ट्विट येणे व त्याची सर्व प्रसारमाध्यमावर चर्चा करने हा संघाच्या रणनीतीचा एक भाग होता. वैदिक विचाराचा विरोधक असलेल्या नारायण गुरु सारख्यांना राष्ट्रीय स्वंयसेवक संघ हिंदू सन्यासी म्हणू लागला आहे. केरळचे मुख्यमंत्री सुध्दा म्हणतात, "अद्वैत वेदांतांचे दार्शनिक चैत्यनाने केरळला ईश्वराची बाग म्हटले आहे. मी ऑर्गनाइज़र आणि संघ यांना अपील करतो की, त्यांनी या बागेत विनाशकारी बीजांचे रोपण करू नये.

यावरून संघाचा आतंक भारतात किती खोलवर रुजत आहे याची संकल्पना येते. आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्वंयसेवक संघ विविध जनजाती, भिन्न भिन्न वर्गातील सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक संघर्षाला फूस लावण्याचे प्रयत्न करीत आहे. भूतकाळातील ब्राम्हण नायकाची भूमिका आजचा राष्ट्रीय स्वंयसेवक संघ वठवीत आहे.मधुर वाणी, धर्मसत्ता आणि वर्णाची श्रेष्ठता ही संघाची बलस्थाने आहेत. ती नष्ट होईपर्यंत भारत व भारतातील बहुजन जनतेला अशांततेच्या आगीत नेहमीच होळपळत राहील्याशिवाय गत्यंतर नाही. ह्या सत्याला कोण बरे नाकारणार?

बापू राऊत, मुंबई
9224343464
E-mail:bapumraut@gmail.com